# कॉक्सिट कॉलेजच्या विद्यार्थ्यांचा एकता दौडेत सहभाग

आज दि. २१ ऑगस्ट रोजी सकाळी साडेसात वाजता लातूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी दिनकर जगदाळे यांच्या हस्ते या उपक्रमाचा शुभारंभ झाला.

लातूर जिल्हयातील नागरिकात सर्वधर्मसमभावाची भावना वृद्धींगत व्हावी यासाठी लातूर पोलिसांच्या वतीने आज (२१ ऑगस्ट रोजी) ‘एकता दौड’ चे आयोजन करण्यात आले. जिल्हा पोलिस अधीक्षक ज्ञानेश्वर चव्हाण यांनी ‘एकता दौड’ चे आयोजन केले.

सकाळी साडेसात वाजता टाऊन हॉल ते क्रीडा संकुल अशी दौड ज्येष्ठ नागरिकांसाठी झाली. याचवेळी खुल्या गटाची दौड टाऊन हॉल ते रेणापूर नाका अन रेणापूर नाक्याहून परत शिवाजी चौक पुढे क्रीडा संकुल अशी झाली.

या उपक्रमात विविध शाळा, एनसीसी, एनएसएस, स्कॉऊट गाइड, सामाजिक संघटना, सेवाभावी संस्था, व्यापारी संघटना, शासकीय, निमशासकीय अधिकारी-कर्मचारी सहभागी झाले.

आगामी काळ सण-उत्सवाचा आहे, रक्षाबंधन, गणेशोत्सव, बकरी ईद असे सण येत आहेत. या निमित्तानं वातावरण अधिक चांगलं व्हावं हा या दौडमागचा उद्देश आहे असं पोलिस अधीक्षक ज्ञानेश्वर चव्हाण यांनी सांगितलं.

